# . महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०१० /२०११

अर्जदार : श्रीमती मंगला बनकर तर्फे
श्री. राकीराम बनकर,
प्लॉट नं. 60, वाठोडा लेआउट,
किर्तीदार सोसायटी,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित,
महाल विभाग, नागपुर.

गणपुर्ती : १) श्री. शिवाजीराव एस. पाटील,
सभापती

२) श्रीमती गौरी चांद्रायण, सदस्या

3) श्रीमती के.के. घरत, सदस्य-सचिव

—— आदेश ——

पारीत दि. १३.०५.२०११

ग्राहक गा-हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक १४.०३.२०११ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ६.४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. श्रीमती मंगला बनकर, अर्जदार, यांनी कुठलीहीपुर्व सुचना न देता गैरअर्जदारातर्फे विद्युत पुरवठा खंडीत करून मीटर काढुन नेण्याबाबत व चुकीचे विद्युत देयक दुरूस्त करण्याबाबत दिनांक ०२.०२.२०११ रोजी आपला तक्रार अर्ज, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, नागपूर शहर प्रविभाग, मराविविकंमर्यादित, नागपूर येथे दाखल केला होता. वरील प्रकरणाबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, नागपूर शहर प्रविभागाने अर्जदाराची विनंती नामंजुर केली. अर्जदार यांना कक्षाचे आदेश मान्य नसल्याने, त्यांनी दिनांक १४.०३.२०११ रोजी, मंचात तक्रार अर्ज दाखल केला आणि मंचाला विनंती केली की...

   १. विद्युत देयकात योग्य ती दुरूस्ती करावी.
   २. विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यात यावा.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रार अर्जानूसार, त्यांना माहे मार्च २०१० मध्ये १३८५५ युनिटचे अवाजवी देयक देण्यात आले. अर्जदाराने सदर देयकाच्या दुरूस्तीबाबत गैरअर्जदारास वारवांर तक्रार केली, परंतु गैरअर्जदारातर्फे त्या तक्रारींची कुठलीही दखल घेण्यात आली नाही. त्यानंतर अर्जदाराने जानेवारी २०११ मध्ये गैरअर्जदारास लिखीत तक्रार दिली. त्यावर गैरअर्जदाराने, अर्जदारातर्फे मीटर चाचणी फी `५००/– भरून घेतली, परंतु त्याचा अहवाल अर्जदारास नाही दिला. तसेच अवाजवी देयक देणे सुरू ठेवले. अर्जदाराचा विद्युत वापर त्याला देण्यात आलेल्या देयकापेक्षा खुप कमी आहे व अवाजवी रक्कम त्यांना भरणे शक्य नाही. आक्टोबर २०१० मध्ये अर्जदाराला कुठलीही पुर्वसुचना न देता अर्जदाराचा विद्युत पूरवठा खंडीत करण्यात आला. अर्जदाराने आपल्या अर्जात विनंती केली आहे की त्यांना नियमाप्रमाणे विद्युत देयक देण्यात यावे व विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यात यावा.

३. गैरअर्जदाराने आपले उत्तर मंचात दिनांक ०२.०४.२०११ रोजी दाखल केले, त्यानुसार अर्जदाराचा ग्राहक क्रं. ४१००१५९३४३६१ असुन त्यांचा विद्युत पुरवठा औद्योगिक वापराकरीता आहे. अर्जदाराचा विद्युत वापर माहे मे २००७ ते एप्रिल २००८ या कालावधीत सरासरी ८०५ युनिट होता. माहे जून २००९ ते सप्टेंबर २००९ या कालावधीत मीटरव्दारे शुन्य युनिट दर्शविल्यामुळे त्यांचा मीटर बदलविण्यात आला. नविन मीटरचा क्रं.९०४५१३५ असुन फेब्रुवारी २०१० पर्यंत व्यवस्थित बिलींग झाली. परंतु मार्च २०१० मध्ये मीटरव्दारे १३८५५ युनिटचे व माहे एप्रिल २०१० मध्ये २०१९ युनिटचे विजवापर दर्शविले. अर्जदाराची सदरबाबत तक्रार मिळाल्यानंतर त्यांचा मीटर पुन्हा बदलविण्यात आला. तक्रार असलेला मीटर क्रं. ९०४५१३५ ची चाचणी करण्यात आली. मीटर चाचणीत मीटर योग्य असल्याचे आढळल्यामुळे देयकामध्ये कुठलीही दुरूस्ती करण्यात आली नाही. परंतु जुन २००९ ते संप्टेबर २००९ देयक दुरूस्त करून ग्राहकास फक्त ५६५० युनिट आकारले व देयकातून रू. ५८६६१ वजा करण्यात आले. अर्जदाराने माहे मार्च २०१० पासुन एकही देयक भरणा न केल्यामुळे ग्राहकाची थकबाकी रू. ७२७२१ झाली व ती देय आहे.

४. दिनांक ११.०४.२०११ रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री. वाघमारे, कार्यकारी अभियंता, महाल विभाग, हे उपस्थित होते.

अर्जदाराची बाजु मांडतांना, त्यांचे प्रतिनिधी श्री. राकीराम बनकर, यांनी मंचास सांगितले की मीटरची चाचणी त्यांच्या समक्ष करण्यात आली नाही. तसेच त्यांच्या विज वापरापेक्षा, त्यांना देण्यात आलेले विद्युत देयक अवाढव्य आहे. मीटरचे काही दोष असल्यानेच असे अवाढव्य विद्युत देयक देण्यात आले आहे, गैरअर्जदाराने मंचाला मीटर चाचणी पून्हा करण्याकरीता आपली संमती दर्शवीली. दिनांक

१९.०४.२०११ रोजी अर्जदारा समक्ष मीटरची चाचणी करण्यात आली मीटर चाचणी अहवाल दिनांक ०२.०५.२०११ रोजी मंचात दाखल करण्यात आला. मीटर चाचणी अहवालानुसार मीटर दोष रहीत आहे.

५. मंचाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले. तसेच मंचात दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर मंचाचे असे मते आहे की अर्जदाराची तक्रार दिनांक मार्च २०१० पासुन आलेल्या विद्युत देयकाबाबत आहे. अर्जदारानुसार वापरापेक्षा मीटरची नोंदी अवाढव्य आहे, म्हणजेच मीटर सदोष आहे. परंतु मीटर चाचणी अहवालानूसार मीटर दोषरहीत आहे, तेव्हा अर्जदाराची देयक दुरूस्तीची विनंती विनीयमाच्या विरूदध आहे. अर्जदाराच्या सी.पी.एल.ची पाहणी केल्यानंतर थकबाकी करीता सुदधा् अर्जदार कारणीभुत असल्याचे आढळले कारण त्यांनी मार्च २०१० पासुन एकही विद्युत देयक भरणा केला नाही. त्यामुळे अर्जदाराचा विद्युत पूरवठा सुरू करण्याबाबतची विनंती सुध्दा् अमान्य करण्यात येत आहे.

## आदेश

अर्जदाराचा तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्री शिवाजीरा स.पाटील) |
| सदस्य–सचिव | सदस्य् | सभापती |